/

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** नायगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**19/10/2023 20:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 19/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/10/2023
**Time From (वेळेपासून):** 12:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 19/10/2023 **Time (वेळ):** 19:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 037

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/10/2023 19:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 04 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, नायगाव,नायगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गणपती गंगाराम पवार

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आतरगांव,नायगांव,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आतरगांव,नायगांव,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8408066674

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवराज दत्तराम नकाते | | | 1. बेटक बिलोली,नायगांव,नायगांव ,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1200/रुपये ज्यात 500रुपये दराच्या दोन व 100 रुपये दराच्या दोन चलनी नोटा. | 1,200.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,200.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 19/10/2023
फिर्याद जबाब
मी गणपती गंगाराम पवार, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती, रा.आंतरगाव, ता.नायगाव, जि.नांदेड. मो.नं. 8408066674.

मी पोलीस स्टेशन नायगाव येथे हजर येवुन तोंडी जबाब देतो की, मी वरिल ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. मला वडील गंगाराम पवार, वय 80 वर्षे, पत्नी महादाबाई पवार वय 45 वर्षे, आठ मुली असा परिवार आहे.

मी आज दिनांक 19/10/2023 रोजी पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे हजर राहुन तक्रार दिली असुन ती अशी की, माझी आंतरगाव, ता.नायगाव गट क्र. 592 मध्ये वडीलोपार्जीत एकुण 34 आर इतकी शेत जमीन आहे. सदर शेत जमीनीवर मला सन 2021-2022 मध्ये पंचायत समीती, नायगाव, जि.नांदेड यांचे कडुन फळबाग लागवडी साठी मला रोजगार हमी योजने अंतर्गत एकुण 1,50,000/- रूपयांचे शासकीय अनुदान मंजुरी प्राप्त झाली असुन सदर शेत जमीनीवर मी एकुण 250 जांबाची झाडे लावली आहेत. सदरचे फळबाग लागवडी साठी मी आमचे गावातील विवीध शेत शेत शेतमजुरांकडुन कामे करून घेतली आहेत. आता पावेतो मला झ्ाालेल्या कामाचे एकुण तिन टप्प्यात 45,000/-रूपये शासकीय अनुदानाची रक्कम मिळाली आहे. चैथा टप्प्यातील झालेल्या कामाचे मी दि.15/09/2023 रोजी ई-मस्टर मागणी अर्ज पंचायत समीती, नायगाव येथे रितसर केला आहे. सदरचे अर्जावरून मला माझे शेतात शेतमजुरांनी केलेल्या कामाचे शासकीय अनुदान प्राप्त होणे आवश्यक आहे. बरेच दिवस होवुनही अनुदानाचे बिल मिळत नसल्याने मी दि. 17/10/2023 रोजी दुपारी 02ः00 वाजता पंचायत समीती, नायगाव येथे गेलो होतो. तेथे माझे झालेल्या कामाचे बिल आॅनलाइन होणे बाकी असल्याने रोजगार हमी योजनेचे आॅनलाईन ई-मस्टर बिले सादर करणारे संगणक कर्मचारी शिवराज नकाते यांनी मला मी सादर केलेल्या अर्जावरून तीन ई-मस्टर मागणी बिलाचे काम आॅनलाईन सादर करण्यासाठी 1500/- रूपयांची अप्रामाणीकपणे स्वतःचे आर्थीक लाभासाठी लाच रक्कमेची मागणी केली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्यामुळे मी त्यांना सध्या माझेकडे रूपये नाहीत असे म्हणुन नंतर रूपये आणुन देतो असे म्हणुन परत आलो.

त्यानंतर मला होणारे लाच मागणी बाबत मी आज दि.19/10/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे वरिल प्रमाणे तक्रार देवुन पंचायत समिती, नायगाव येथील संगणक कर्मचारी शिवराज नकाते यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करणे बाबत विनंती केली.

मी दिलेल्या तक्रारीवरुन आज दिनांक 19/10/2023 रोजी दुपारी 11ः33 वा. चे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथील पो.नि.श्री.संदिप थडवे व दोन शासकीय पंचासह, सापळा पथक असे शासकीय वाहनाणे नांदेड-नायगाव रोडवरील नायगाव तहसीले फाटयाचे आलीकडे असलेल्या कॅनलचे रोडने आत एका सुरक्षीत व निर्जण स्थळी आलो.त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे यांनी माझी व दोन्ही शासकीय पंचाची तसेच सापळा पथकातील सदस्याची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझे दिलेल्या तक्रारीची माहिती दोन्ही पंचाना तोंडी सांगीतली. तसेच माझी आज दिनांक 19/10/2023 रोजी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचानी वाचुन खात्री केली. त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे, दोन्ही पंच व माझे परिचयदर्शक वक्तव्य व्हाईस रेकाॅर्डरद्वारे रेकाॅर्ड करून घेतले. त्यानंतर मला तसेच पंच क्र.1 श्री.वैजनाथ नागनाथ सावरकर, पंच क्र.2 सतिश देविदासराव पोटे व सापळा पथकातील सदस्यानां लाचमागणी पडताळणी अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे यांचे सुचने प्रमाणे पोकाॅ. जाधव यांनी माझेकडे व्हाईस रेकाॅर्डर चालु करून देवुन माझे सोबत पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर यांना देवुन मला पंचायत समिती, नायगाव येथील संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी कामी 12ः08 वाजता रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर असे आम्ही दोघेजन कॅनल रोड येथुन शासकीय वाहनाने रवाना होवुन पंचायत समिती, नायगाव चे मेन



Scanned with CamScanner

रोडवर उतरून तेथून मी व पंच क्र.1 वैजनाथ सावरकर असे दोघे पायदळ करीत पंचायत समिती, नायगाव येथील संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांची त्यांचे कक्षात भेट घेतली. तेव्हा संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांनी माझे फळबागचे कामाचे रोजगार सेवक यांचे तीन ई-मस्टर मागणी संबंधाने बोलनी केली तेव्हा 'द्या काहीतरी द्या दोनशे कमी द्या, दोन-तिनशे कमी द्या, चारशे-चारशे द्या' असे म्हणुन माझेकडे पंचासमक्ष तीन ई-मस्टर मागणी बाबत प्रत्येकी 400/-रू. प्रमाणे एकुण 1200/- रूपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना बर सर ठीक आहे, असे बोलून थांबायला सांगून तेथुन निघुन आलो. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर असे आम्ही दोघेजन मिळुन शासकीय चार चाकी वाहनाने कॅनल रोड येथे 12ः32 वाजता परत आलोत. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर माझे जवळील व्हाईस रेकाॅर्डर बंद केल्यानंतर पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर व माझेकडे आम्ही पंचायत समिती, नायगाव येथे रवाना होवुन परत येईपर्यंत घडलेल्या घटने संबंधाने सविस्तर वेगवेगळी विचारपुस केली. त्यानंतर दोन्ही पंच व माझे समक्ष लाचमागणी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड झालेले संभाषण ऐकुन त्यात संगणक आॅपरेटर षिवराज नकाते यांनी माझेकडे माझे शेतातील फळबागाचे झालेल्या कामाचे रोजगार हमी योजनेचे आॅनलाईन तीन ई-मस्टर बिले मागणी सादर करण्यासाठी प्रत्येकी चारशे-चारशे रूपये प्रमाणे 1200रू. स्विकारण्याचे मान्य करून आज रोजी माझेकडे 1200/- रूपये लाचेची मागणी केले असल्याची खात्री केली.

त्यानंतर पो.नि. श्री.संदिप थडवे यांनी मला 1200/- रुपये हजर करण्यास सांगीतले त्यावेळी मी माझे कडील 1200/- रुपये ज्यात पाचषे रुपये दराच्या दोन व शंभर रुपये दराच्या दोन चलनी नोटा हजर केल्या असता ते पो. नि.श्री.संदिप थडवे यांनी पंचासमक्ष ताब्यात घेवून पंच क्र.2 सतिश देविदासराव पोटे यांचेद्वारे सदर नोटांचे वर्णन व क्रमांक नोंदवुन घेतले. त्यानंतर शासकीय वाहनात मला तसेच दोन्ही पंचाना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन अॅन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर मी हजर केलेल्या पाचशे रुपये दराच्या दोन व शंभर रूपये दराच्या दोन चलनी नोटास अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्या नोटा माझे पॅन्टच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवुन दिल्या.

त्यानंतर पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी सापळा कार्यवाहीचे अनुषंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकातील सर्व सदस्यांनी कोणी काय करावे या बाबत सविस्तर सुचना दिल्या. तसेच मला संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांनी लाच स्विकारल्यानंतर करावयाचा ईशारा समजावुन सांगुन सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर 13.05 वाजता पोकाॅ. ईश्वर जाधव यांनी पो.नि.श्री.संदिप थडवे यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझे गळ्यात सुरक्षीत लटकावून ठेवले व आम्ही शासकीय चार चाकी वाहनात मी, पो.नि. श्री.संदिप थडवे, पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर, पंच क्र.2 सतिश पोटे, सपोउपनि.गजेंद्र मांजरमकर, पोकाॅ.यशवंत दाबनवाड, पोकाॅ. ईश्वर जाधव असे शासकीय वाहनात बसुन कॅनल रोड येथुन निघुन नांदेड-नायगाव रोडवरील तहसील फाटा, नायगाव येथे पोहचल्यानंतर मी व पंच क्र1 श्री.वैजनाथ पोटे असे वाहनातून खाली उतरून पंचायत समिती, नायगाव कार्यालयाकडे पायदळ रवाना झालो. तसेच पो.नि. श्री.संदिप थडवे व सापळा पथकातील वरील सदस्य, पंच क्र.2 असे वेगवेगळे वाहनातून उतरून पायदळ आमचे पाठोपाठ आले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 असे आम्ही दोघजन मिळुन पंचायत समिती, नायगाव येथे जावुन संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांची भेट घेवुन त्यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान मागणी केल्या प्रमाणे माझे जवळील अॅन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम 1200/-रू. माझे पॅन्टच्या उजव्या खिशातुन काढुन समोर धरली. तेव्हा त्यांनी माझेकडुन अॅन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम पंच क्र.1 श्री.वैजनाथ सावरकर यांचे समक्ष स्विकारून त्यांचे शर्टाच्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा पथकास लाच स्विकृती बाबतचा ईषारा मिळताच 13.20 वाजता पो.नि. श्री.संदिप थडवे व सापळा पथकातील सदस्य यांनी सतर्क होवुन संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांना त्यांचे कक्षात जागीच ताब्यात घेतले व संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांचेकडून पो.नि.श्री.संदिप थडवे यांनी पंच क्र.2 यांचे हस्ते मी दिलेले 1200/- रूपये ताब्यात घेतले.

त्यानंतर संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांना त्यांचे संपुर्ण नांव, गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव शिवराज दत्तराम नकाते, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी पद क्लर्क कम डेटा एन्ट्री आॅपरेटर (CDEO), नेमणुक तहसिल व पंचायत समिती कार्यालय, नायगाव, जि.नांदेड, रा.बेटक बिलोली, ता.नायगाव, जि.नांदेड असे सांगीतले. तरी आज दिनांक 19/10/2023 रोजी वेळ 12.08 ते 13.20 वाजताचे दरम्यान पंचायत समिती, नायगाव, जि. नांदेड येथील म.ग्रा.रो.ह.यो. कक्षात संगणक आॅपरेटर शिवराज नकाते यांनी पंचासमक्ष मला माझे शेतातील रोजगार हमी योजना अंतर्गत झालेल्या फळबागचे कामाचे रोजगार सेवक यांचे तीन ई-मस्टर मागणी संबंधाने 'द्या काहीतरी द्या दोनशे कमी द्या, दोन-तिनशे कमी द्या, चारशे-चारशे द्या' असे म्हणुन माझेकडे पंचासमक्ष तीन ई-मस्टर मागणी बाबत प्रत्येकी 400/-रू. प्रमाणे एकुण 1200/- रूपये अप्रामणीकपणे स्वतःचे आर्थीक लाभासाठी लाचेची



Scanned with CamScanner

मागणी करून आज रोजी पंचासमक्ष 1200/- रूपये लाचेची रक्कम त्यांनी स्वतः स्विकारली म्हणुन माझी शिवराज दत्तराम नकाते, वय 36 वर्षे, व्यवसाय नौकरी पद क्लर्क कम डेटा एन्ट्री आॅपरेटर (CDEO), नेमणुक तहसिल व पंचायत समिती कार्यालय, नायगाव, जि.नांदेड, रा.बेटक बिलोली, ता.नायगाव, जि.नांदेड याचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

JAYPRAKASH KASHINATH GUTHE(I (Inspector)) / 14901000362JKGM7701F **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): JAYPRAKASH KASHIN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14901000362JKGM770



पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे नायगांव

Scanned with CamScanner